# मावळा गीताद्वारे इंडिया आशा फौंडेशनचा 'हर घर तिरंगा' अभियानात सहभाग

• पुणे •

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. इंडियाआशा फौंडेशनतर्फे या अभियानात वेगळ्याप्रकारे सहभागी होण्यासाठी एक देशभक्तीपर गीत तयार करण्यात आले आहे – मी एक निनावी मावळा . दि. १३ ऑगस्ट रोजी हे गीत प्रसारितकरण्यात येणार आहे.हर घर तिरंगा अभियानांतर्गत एक आठवड्यात दहा दशलक्ष नागरिकांनी हे गीत ऐकावे/पहावे असे उद्दिष्ट संस्थेने डोळ्यासमोर ठेवले आहे. त्यासाठी प्रत्येक भारतीयाने आपले कुटुंबीय, नातेवाईक व परिचित अशा किमान १० सदस्यांपर्यंत मावळा गीत पोहचवावे असे आवाहन इंडियाआशा फौंडेशनतर्फे करण्यात येत आहे.

देशसेवेचा वसा स्वीकारून निष्ठेने भारतीय जवान आपल्या प्राणांची पर्वा न करता अहोरात्र कष्ट करतात. थंडी, ऊन, पाऊस व इतर अनेक अडचणींचा सामना करत रात्रंदिन शत्रूशी दोन हात करत असतात. आपलं कुटुंब, गाव असा संकुचित विचार न करता मातृभूमीची सेवा करत भारताचे स्वातंत्र्य, सुरक्षा व स्थैर्य अबाधित राखण्यासाठी झटत असतात.दरवर्षी स्थल, वायू व नौसेनेत भरती होण्यासाठी लाखो तरुण प्रेरित होतात. मातृभूमीच्या रक्षणाचे बाळकडू त्यांना आपल्या कुटुंबियांकडून, गावातील लोकांकडून व मातीतूनच मिळते. प्रत्येक भारतीयासाठी आदर्श व जीवनातले खरे ' हिरो ' घडवण्यात अनेकांचे हातभार लागतात. देशाच्या कानाकोपऱ्यातील गावातून आलेले हे अनोळखी ' हिरो ' सैन्यात भरती होतात. भारतमातेला असे अनोळखी, न पाहिलेले हिरो दिल्याबद्दल प्रत्येक गावकऱ्याच्या उपकारांची जाणीव ठेवून त्यांच्याप्रती आदरपूर्वक कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी इंडियाआशा फौंडेशनतर्फे देशभक्तीपर गीत तयार केले आहे मी एक निनावी मावळा .

सीमेवर लढणारे जवान तर महान आहेतच परंतु आरोग्य,शेती, क्रिडा, कला, साहित्य, संशोधन, उद्योग अशा इतरही क्षेत्रात निष्ठेने काम करून अनेक लोकांनी भारताचे नाव जगात उज्वल केले आहे. प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा, देशसेवेसाठी प्रेरणा मिळावी व देशाची प्रतिमा जगभरात सकारात्मकरित्या उंचावण्याचे काम मी एक निनावी मावळा या गीतातून होणार आहे.

गायिका/संगीतकार हिमांगी विश्वरूप यांचा थोडक्यात परिचय : उत्कटतेने भावनाप्रधान गाणी गाणारी गायिका व संगीतकार हिमांगी विश्वरूप यांनी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे शिक्षण लहानपणापासून आपल्या मातोश्री ऋचा विश्वरूप यांच्याकडे घेतले. २०१४ सालापासून शास्त्रीय संगीताचे धडे शंकर महादेवन अकादमी मध्ये घेतले व तेथेच संगीत शिक्षिका म्हणून २०१८ सालापर्यंत त्या कार्यरत होत्या.मूलत: आयटी इंजिनीअर असलेल्या हिमांगी यांनी संगीताची आवड असल्याने आपली जास्त पगाराची नोकरी सोडून संगीत आराधनेसाठी स्वत:ला वाहून घेतले. मराठीतील ज्येष्ठ संगीत दिग्दर्शक श्री. अशोक पत्की यांच्याकडेही त्यांनी शिक्षण घेतले व त्यांची सहकारी म्हणून काम केले. टी सिरीज अंतर्गत श्री संजय विद्यार्थी यांच्याकडे प्रशिक्षण घेतले. शंकर महादेवन अकादमीतर्फे त्यानी संगीत दिलेल्या गझलचे प्रसारण श्री. शंकर महादेवन व उस्ताद झाकीर हुसेन यांच्या उपस्थितीत झाले.